महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २१५ वे | दिनांक : ३०/०७/२०२६ | वार : गुरूवार

## 'ड्रग्ज फ्री मुंबई' अभियानाचा शुभारंभ



**मुबई :** "आज आपला भारत देश अंतराळ संशोधन, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि संरक्षण क्षेत्रात जगाला थक्क करणारी प्रगती करत आहे. समोरच्या युद्धात भारताला हरवणे शक्य नसल्याचे शत्रूंना कळून चुकले आहे. त्यामुळे भारताची खरी ताकद असलेल्या युवा पिढीला अमली पदार्थांच्या जाळ्यात ओढून देशाला आतून पोकळ करण्याचे मोठे षड्यंत्र आणि एक 'छुपे युद्ध' सुरू आहे. हे षड्यंत्र उधळण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन ड्रग्जच्या विरोधात सामूहिक लढा उभारणे गरजेचे आहे," असे आवाहन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

मुंबईत आयोजित 'नशामुक्त मुंबई' (Drug Free Mumbai) अभियानाच्या शुभारंभ प्रसंगी १० हजारहून अधिक विद्यार्थी, शिक्षक आणि नागरिकांना संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी त्यांनी उपस्थितांना 'नशामुक्त मुंबई आणि भारत' घडवण्याची सामूहिक शपथ दिली.

भारताच्या वाढत्या जागतिक ताकदीचा संदर्भ देत मुख्यमंत्र्यांनी ड्रग्ज माफियांच्या षड्यंत्रावर प्रकाश टाकला. भारत हा जगात सर्वात जास्त तरुणाई असलेला देश आहे. ही युवाशक्ती योग्य दिशेने गेली, तर भारत जगाचा 'महागुरू' आणि 'महाशक्ती' बनेल. शत्रूंना हे स्पष्टपणे माहीत आहे की भारताला समोरासमोरच्या युद्धात पराजित करता येत नाही. म्हणून त्यांनी तरुण पिढीला व्यसनाधीन करून देशाला भविष्यात नेस्तनाबूत करण्याचे 'छुपे युद्ध' सुरू केले असून, 'ड्रग्ज' हे या युद्धाचे सर्वात मोठे शस्त्र आहे. दुर्दैवाने केवळ पैशांच्या हव्यासापोटी आपल्याच देशातील काही प्रवृत्ती या देशविघातक षड्यंत्रात सामील झाल्या आहेत, असेही ते म्हणाले.

ड्रग्जचे समूळ उच्चाटन करण्यासाठी केवळ एक विभाग पुरेसा नसून संपूर्ण 'इकोसिस्टीम' नष्ट करण्याची गरज असल्याचे फडणवीस म्हणाले. पोलीस, समाजकल्याण, आरोग्य, शालेय शिक्षण विभाग यांच्यासह शिक्षक आणि पालकांनी एकत्र येऊन काम करणे गरजेचे आहे. सिंथेटिक ड्रग्जचे उत्पादन होणाऱ्या जागा, त्यांचे पुरवठादार आणि शाळा-कॉलेजांच्या परिसरात ड्रग्ज विकणाऱ्यांचे नेटवर्क आणि त्यांचे 'आका' शोधून त्यांच्यावर कठोर कारवाई केली जाईल.

जर तरुणाईनेच ड्रग्जला ठामपणे No to Drugs म्हणण्याचा संकल्प केला, तर कोणाचीही हिंमत ड्रग्ज विकण्याची होणार नाही. पुढील दोन ते चार वर्षांत आपण 'ड्रग्ज फ्री मुंबई' आणि 'ड्रग्ज फ्री महाराष्ट्र' नक्कीच घडवू. स्वामी विवेकानंदांच्या विचारांची आठवण करून देत मुख्यमंत्र्यांनी तरुणांना त्यांच्यातील ऊर्जेची जाणीव करून दिली: 'युवा' हा शब्द उलटा केल्यास 'वायू' बनतो. वायू जेव्हा वादळाचे रूप घेतो, तेव्हा तो प्रचंड विनाश करतो. पण तोच वायू जेव्हा 'ऑक्सिजन' बनतो, तेव्हा तो समाजाला जीवन देतो. आजच्या तरुणाईने समाजासाठी विनाशकारी वादळ न बनता, देशाला जिवंत ठेवणारा 'ऑक्सिजन' बनले पाहिजे.

ड्रग्जच्या संकटाचा सामना करण्यासाठी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या 'गनिमी काव्या'चा उल्लेख केला. मी स्वतः सर्व शाळा व कॉलेजांच्या मुख्याध्यापकांना आणि प्राचार्यांना पत्र लिहित आहे. कॅम्पसच्या आसपास ड्रग्ज विकणाऱ्यांची किंवा व्यसनाकडे ढकलणाऱ्यांची माहिती त्वरित सरकारला द्यावी.

जे नागरिक, शिक्षक किंवा विद्यार्थी अशी माहिती देतील, त्यांचे नाव पूर्णपणे गुप्त ठेवले जाईल. भविष्यात माहिती देणाऱ्यांना शासनाकडून पुरस्कृतही केले जाईल, पण त्यांची ओळख कधीच उघड होणार नाही.

एका सर्वेक्षणाचा दाखला देत त्यांनी सांगितले की, वयाच्या २१ ते २२ वर्षांपर्यंत जर तरुण ड्रग्जपासून दूर राहिला, तर तो आयुष्यात कधीही व्यसनाकडे वळत नाही. त्यामुळे हा काळ स्वतःला सांभाळण्याचा आहे.

भाषणाच्या शेवटी मुख्यमंत्र्यांनी विद्यार्थ्यांना शपथेचे महत्त्व समजावून सांगितले. "माणूस जगाशी खोटं बोलू शकतो, पण स्वतःच्या मनाशी खोटं बोलू शकत नाही. आज छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या साक्षिने घेतलेली 'ड्रग्ज फ्री मुंबई'ची शपथ ही केवळ औपचारिकता नसून ते स्वतःशी घातलेले बंधन आहे," असे सांगत त्यांनी तरुणांना नशामुक्त भारत घडवण्याचे आवाहन केले.

## कोयना धरणाचे ६ दरवाजे पावसाळ्यात प्रथमच उघडले



**सातारा :** सह्याद्री च्या डोंगररांगां मध्ये सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे कोयना धरणातील पाणीसाठ्यात सातत्याने वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर धरणाची पाणीपातळी नियंत्रित ठेवण्यासाठी गुरुवारी (३० जुलै) सायंकाळी प्रथमच धरणाचे सहा वक्र दरवाजे उघडण्यात आले. यामुळे कोयना नदीत पाण्याचा विसर्ग सुरू झाला असून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

कोयना धरण व्यवस्थापन विभागाने दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी ५ वाजता धरणाचे सहा वक्र दरवाजे प्रत्येकी एक फूट उघडण्यात आले. या दरवाजांमधून ५,०७९ क्युसेक पाणी कोयना नदीपात्रात सोडण्यात येत आहे.

याशिवाय धरणाच्या पायथा विद्युतगृहातील एक युनिट कार्यान्वित असून, त्याद्वारे आणखी १,०५० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे कोयना नदीमध्ये सध्या एकूण ६,१२९ क्युसेक पाणी सोडण्यात येत आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाचा जोर कायम असल्याने धरणात येणाऱ्या पाण्याचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे आगामी काळात पावसाची तीव्रता आणि धरणात होणारी आवक लक्षात घेऊन सांडव्यावरील विसर्गात वाढ करण्याची शक्यता असल्याचे धरण व्यवस्थापन विभागाने स्पष्ट केले आहे.

कोयना धरणातून पाणी सोडल्यामुळे नदीची पाणीपातळी वाढणार असल्याने नदीपात्र आणि नदीकाठच्या परिसरातील नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन सिंचन विभागाने केले आहे.

नदीपात्रात किंवा पाण्याच्या प्रवाहाजवळ जाणे टाळावे, तसेच नदीकिनारी असलेल्या गावांच्या ग्रामपंचायती, स्थानिक प्रशासन आणि संबंधित यंत्रणांनी परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे कोयना सिंचन विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी म्हटले आहे.

धरणातील पाणीसाठा, पावसाची तीव्रता आणि नदीतील विसर्ग यावर प्रशासनाकडून सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता अधिकृत सूचनांचे पालन करावे आणि आवश्यक असल्यास स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहनही करण्यात आले आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० जुलै २०२६


## वांगी खुर्दला 'विजयपथ' वाचनालयाची भेट



**वांगी खुर्द (प्रतिनिधी) :** ज्ञानाचा प्रकाश पसरविणाऱ्या पवित्र गुरुपौर्णिमेचे औचित्य साधत वांगी खुर्द येथे 'विजयपथ वाचनालय व अभ्यासिकेचे' अत्यंत थाटात उद्घाटन संपन्न झाले.केंद्रीय ग्राहक संरक्षण समितीचे जिल्हाध्यक्ष श्री.विजय म्हस्के पाटील यांच्या पुढाकारातून आणि स्वखर्चातून गावातील नवतरुणाईसाठी या दर्जेदार अभ्यासकेंद्राची उभारणी करण्यात आली आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी पोषक वातावरण व हक्काचे व्यासपीठ मिळावे, हा यामागचा मुख्य उद्देश आहे. गुरुपौर्णिमेच्या मुहूर्तावर या ज्ञानरूपी पर्वाचा शुभारंभ झाल्याने संपूर्ण गावात आनंदाचे वातावरण आहे. यावेळी श्री.गंगाधर जाधव, श्री. रमेश म्हस्के, श्री. मोबिनाभाई पठाण, श्री. अजिनाथ महाकाळ, श्री.लक्ष्मण दौड, श्री.योगेश म्हस्के, श्री.दत्तु महाकाळ, श्री.दादाराव भिसे, श्री.दाऊद पठाण, श्री.अजिनाथ म्हस्के, श्री.पवन मुरकुटे, श्री.कृष्णा मुरकुटे, श्री.अजिनाथ वीर, श्री. विलास म्हस्के, श्री. सुनील शेळके, श्री.नितेश म्हस्के, श्री. गौरव बोरसे, श्री. सागर महाकाळ आणि श्री. रोहित म्हस्के यांच्यासह बहुसंख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. ग्रामस्थांची प्रतिक्रिया: "गावातील मुलांनी उच्च शिक्षण घेऊन अधिकारी व्हावे,यासाठी विजयभाऊंनी दिलेली ही वाचनालयाची भेट खऱ्या अर्थाने ऐतिहासिक व मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी दीपस्तंभ ठरेल.

\- **श्री. लक्ष्मण पाटील मुरकुटे**
[शालेय समिती अध्यक्ष]


इरफान इनामदार
मो. 8956362639
8087880274
9405109103
E-mail : sahilcomputer05@gmail.com

साहिल
कॉम्प्युटर्स ॲण्ड प्रिंटर्स

- डी.टी.पी.जॉब वर्क
- मराठी, हिंदी, इंग्रजी
- एम.फील-पी.एच.डी.,थेसिस
- स्पायरल / हार्ड बाईंडींग
- लॅमिनेशन
- कलर प्रिंट

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपुरा, औरंगाबाद.

प्रवेश सुरू

- बी.ए. मराठी व उर्दु
- एम.ए.
- एम.कॉम.
- बी.लिब.
- एम.लिब.
- DMLT
- फिजीओथेरपी
- रेडीओलॉजी
- OT टेक्नीशीएन
- MSW
- M.B.A.
- ECG X-Ray
- डिप्लोमा ऑप्थोमेट्री
- इलेक्ट्रीशिएन
- BEMS
- नर्सिंग
- डी.फार्मसी
- ECG टेक्नीशीएन

४ थी पास ते १२ वी नापास यांना सहा महिन्यात १२ वी पास (पूर्वतयारी)

❋ संपर्क ❋

प्राचार्य डॉ. हसन इनामदार - 9405109103 / 8830838903


# कासाई महाविद्यालयाचा पदवीदान सोहळा उत्साहात







**गोषेगाव (प्रतिनिधी) :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर संलग्नित कासाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोषेगाव येथे बुधवार, दि. २९ जुलै २०२६ रोजी पदवीदान समारंभ अत्यंत उत्साहपूर्ण व शैक्षणिक वातावरणात संपन्न झाला. यावेळी पदवीधर विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रे व सन्मानपत्रे प्रदान करून त्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यात आला.समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विलास देवचंद उमरे होते. प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, सिल्लोड येथील मराठी साहित्याचे अभ्यासक प्रा. डॉ. ज्ञानेश्वर शेजुळ, सत्यशोधक महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य सुनील वाकेकर, समर्थ प्रतिष्ठान, गव्हालीचे संस्थापक अध्यक्ष श्री. सचिन इंगळे तसेच हसनाबाद पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक (API) श्री. योगेश पाटील उबाळे तर डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट सदस्य- डॉ भगवान डोभाळ सर उपस्थित होते. दीपक भागवत यांच्या हाती विद्यापीठ ध्वज देऊन सर्व मान्यवरांनी पद संचालन केले. दीप प्रज्वलन करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिनिधी पूजन व अभिवादन करून कार्यक्रमास सुरुवात झाली.कार्यक्रमास श्री. विजयसिंग डोभाळ, श्री. गंभीरराव पाटील मोहिते, श्री. काकासाहेब पवार आणि श्री. मनोज लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. ज्ञानेश्वर शेजुळ यांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी जिद्द, चिकाटी, सातत्य आणि कठोर परिश्रम यांच्या बळावर यश संपादन करावे, तसेच उच्च शिक्षण, स्पर्धा परीक्षा, संशोधन आणि समाजसेवा या क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देऊन समाजात आदर्श निर्माण करावा, असे आवाहन केले.प्राचार्य सुनील वाकेकर यांनी विद्यार्थ्यांनी पदवी शिक्षणासोबत व्यक्तिमत्त्व विकास, वाचनसंस्कृती, बौद्धिक उपक्रम आणि विविध स्पर्धांमध्ये सक्रिय सहभाग घेऊन स्वतःचे ज्ञान व कौशल्य वृद्धिंगत करावे, असा प्रेरणादायी संदेश दिला.श्री. सचिन इंगळे यांनी पदवी ही शिक्षणाची अंतिम पायरी नसून उज्ज्वल भविष्यासाठी नव्या संधींचे प्रवेशद्वार असल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी आत्मविश्वास, सकारात्मक विचार आणि सामाजिक बांधिलकी जोपासावी, असे प्रतिपादन केले.डॉ. भगवान डोभाळ सर यांनी नियमित अभ्यास व पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. विलास देवचंद उमरे यांनी पदवीदान समारंभ हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अभिमानाचा आणि जबाबदारीची जाणीव करून देणारा महत्त्वपूर्ण टप्पा असल्याचे सांगितले. गुणवत्तापूर्ण शिक्षण, चारित्र्यनिर्मिती आणि समाजाभिमुख कार्य या त्रिसूत्रीच्या माध्यमातून विद्यार्थी राष्ट्रनिर्मितीत मोलाचे योगदान देतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमास पालक, विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. अभिषेक मोरलवार यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रा. सौ. ललिता गायकवाड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जिंतूर आसेगाव परभणी बस बंद झाल्याने विद्यार्थी व प्रवाशांचे हाल.

**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** वस्सा - जिंतूर आगाराची आसेगाव परभणी बस अचानक बंद करण्यात आली आहे.यामुळे परिसरातील वस्सा,आसेगाव व दुधगाव परिसरातील विद्यार्थी व प्रवाशांचे हाल होत आहेत.ज्याकडे जिंतूरच्या आगारप्रमुखांचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे.जिंतूर आगाराची वस्सा,आसेगाव परभणी ही बससेवा पंढरपूर यात्रेचे निमित्त सांगून बंद करण्यात आली आहे.पंढरपूर यात्रे निमित्त बंद करण्यात आलेल्या ग्रामीण भागातील इतर बससेवा पूर्ववत सुरु करण्यात आल्या आहेत.परंतु आसेगाव मार्गे परभणी बससेवा अद्याप सुरु करण्यात आली नाही.हे न उलगडणारे कोडे आहे.या बसला प्रवाशांची तोबा गर्दी असते.परिसरातील विद्यार्थी व प्रवाशांना जिंतूर व परभणीशी जोडणारी ही बस आहे.सध्या बंद करण्यात आलेली ही बस कधीच वेळेवर सोडली जात नाही.जिंतूर आगारातून सायंकाळी 6.30 वा सुटण्याची बसची वेळ आहे.परंतु ही बस नेहमी 7.30 वा का ? सोडली जाते.हे प्रवाशांना समजत नाही.ही बस बंद असल्याने परिसरातील विद्यार्थी व प्रवाशांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत आहे.हे लक्षात घेऊन आगारप्रमुखांनी जिंतूर आसेगाव परभणी बस पूर्ववत व वेळेवर सुरु करावी जेणेकरून प्रवाशांचे हाल होणार नाहीत अशी मागणी परिसरातील विद्यार्थी व प्रवाशांनी केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० जुलै २०२६


## जगाची रीत न्यारी

प्रत्येकाला वाटते,सारे माझेच आहे.
कोणी नाही कुणाचा,स्वार्थाने वाट पाहे.

भ्रमात जगतो माणूस,जगाची रीत न्यारी.
ज्याला त्याला आहे,आपलीच पोरं प्यारी.

काही दिल्यास त्याला,म्हणतो खूपच भारी.
नाही दिल्यास काही,उणे दुणे काढतो सारी.

मनासारखे वागल्यास,पदरात घेणार चूक.
मनाविरुद्ध वागता,धरणार सदैव डूक.

असा आहे माणूस,स्वार्थाने भरभटलेला.
स्वतःच्या प्रसिद्धीसाठी,सदा हपापलेला.

कामापुरता आज इथे,सारेच बोलतात गोड
काम संपता म्हणतात,त्याचा दोस्ताना सोड.

जिकडे पहा तिकडे,दिसते भ्रमाचा भार.
निस्वार्थी माणूस इथे,खातो व्यवस्थेचा मार.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६

**बीड, (भगवंत पाळवदे) :** महाराष्ट्र शासनाच्या 2 जून 2026 रोजीच्या निर्णयानुसार जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026 लागू करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यातील 11 तालुक्यांमधील एकूण 97 हजार 194 शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले आहेत. मात्र, आजतागायत केवळ 27 हजार 500 शेतकऱ्यांचे आधार प्रमाणीकरण अर्थात ई-केवायसी पूर्ण झाले असून, उर्वरित शेतकऱ्यांनी योजनेचा लाभ मिळवण्यासाठी तात्काळ आपले आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा उपनिबंधक सतिश टोटावार यांनी केले आहे.पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना 2026 योजनेअंतर्गत बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, कॅनरा बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया, इंडियन बँक, पंजाब नॅशनल बँक, स्टेट बँक ऑफ इंडिया, युको बँक, युनियन बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयीकृत बँकांसह ॲक्सिस बँक, डीसीबी बँक, एचडीएफसी बँक, आयसीआयसीआय बँक, आयडीबीआय बँक, कोटक महिंद्रा बँक, आरबीएल बँक, महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि दि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून पीक कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांचा यामध्ये समावेश आहे. आधार प्रमाणीकरणासाठी पात्र शेतकऱ्यांनी जवळच्या आपले सरकार सेवा केंद्रावर जावे. स्वतःचे आधार कार्ड आणि बँकेचे पासबुक ठेवावे. कर्जमाफीच्या यादीतील आपला विशिष्ट क्रमांक सेवा केंद्र चालकाला द्यावा. हे आधार प्रमाणीकरण पूर्णपणे मोफत असणार आहे. कर्जमुक्तीचा लाभ मिळण्यामध्ये कोणतीही अडचण येऊ नये, यासाठी सर्व पात्र शेतकऱ्यांनी विनाविलंब आपले आधार प्रमाणीकरण पूर्ण करून घ्यावे, असेही प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे

## ढेपाळलेली स्वार्थी राजसत्ता आणि शिक्षणाचा झालेला बाजार

मित्रांनो,सध्याच्या भारतातील घडामोडी शिक्षण आणि ढेपाळलेली राजसत्ता या संदर्भाने आपल्याला चिंतन केल्याशिवाय देशाच्या विकासाच्या वाटा शोधणे कठीण होईल. म्हणून आपण आज या विषयाकडे सकारात्मक दृष्टीने पाहणार आहोत.भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून ओळखला जातो. या लोकशाहीचे दोन सर्वात महत्त्वाचे आधारस्तंभ म्हणजे उत्तरदायी राजसत्ता आणि सर्वांसाठी समान शिक्षणव्यवस्था. परंतु आज या दोन्ही स्तंभांवर गंभीर प्रश्नचिन्हे उभे राहिले आहे. एका बाजूला राजकारण हे लोकसेवेपेक्षा सत्तासंघर्ष आणि स्वार्थाचे साधन बनत चालले आहे, तर दुसऱ्या बाजूला शिक्षण हे ज्ञानाचे मंदिर न राहता मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहाराचे केंद्र बनत असल्याची टीका अनेक स्तरांतून होत आहे. संशोधनांमध्येही वाढत्या खासगीकरणामुळे प्रवेश वाढला असला तरी समान संधी, परवडणारा खर्च आणि गुणवत्तेतील असमानता ही मोठी आव्हाने असल्याचे नमूद केले आहे.राजकारणाचा मूळ उद्देश समाजहिताचा असला पाहिजे. मात्र अनेकदा निवडणुका, पक्षांतर, भ्रष्टाचार, सत्तेसाठी होणारे संघर्ष, जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे होणारे दुर्लक्ष आणि प्रशासनातील उत्तरदायित्वाचा अभाव यामुळे लोकांचा शासनावरील विश्वास कमी होतो. लोकशाही टिकण्यासाठी सत्ता ही जनतेची सेवक असली पाहिजे; ती जनतेवर राज्य करणारी नसावी असे वाटते. अशा या परिस्थितीमध्ये शिक्षणाचा बाजार झाल्याचे दिसते आहे.शिक्षण ही घटना-संमत सामाजिक जबाबदारी आहे. तरीही अनेक कुटुंबांना वाढती फी, कोचिंग संस्कृती, स्पर्धा परीक्षा, देणगी, महागडे व्यावसायिक अभ्यासक्रम आणि रोजगाराच्या अनिश्चिततेचा सामना करावा लागत आहे. केंद्र सरकारनेही शिक्षणाचे व्यापारीकरण रोखण्याची भूमिका वारंवार मांडली असून कंपिटेशन फीवर बंदी आणि नियमनाची तरतूद असल्याचे स्पष्ट केले आहे.नियमावली असणे आवश्यक आहे. त्यासोबत त्याची चूक अमोल भाऊ जेवण होणे गरजेचे आहे परंतु तसे होत नाही.आज अनेक विद्यार्थ्यांसाठी शिक्षण म्हणजे ज्ञानप्राप्तीपेक्षा परीक्षा, गुण आणि नोकरी यापुरते मर्यादित होत आहे. शिक्षणातील मूल्य, विचारशक्ती, संशोधन आणि सामाजिक बांधिलकी यांना अपेक्षित स्थान मिळत नाही, अशी चिंता शिक्षणतज्ज्ञही व्यक्त केली आहे.राजकारण सक्षम असेल तर शिक्षणाला दिशा मिळते. शिक्षण सक्षम असेल तर समाजात जागरूक नागरिक घडतात. परंतु राजकारण स्वार्थी आणि शिक्षण व्यापारी झाले तर समाजात असमानता, बेरोजगारी, निराशा आणि सामाजिक तणाव वाढण्याचा धोका निर्माण होतो. तो धोका भारतामध्ये वाढल्याचे निष्पन्न झाले आहे दिसते आहे.काय बदलले पाहिजे?शिक्षण हे नफा कमावण्याचे साधन नव्हे तर सामाजिक गुंतवणूक मानली पाहिजे.शासकीय शिक्षणव्यवस्था अधिक सक्षम आणि गुणवत्तापूर्ण करावी.शिक्षण संस्थांमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि समान संधी वाढवाव्यात.राजकारणात नैतिकता, सार्वजनिक उत्तरदायित्व आणि जनहिताला प्राधान्य दिले पाहिजे.विद्यार्थ्यांमध्ये संविधानिक मूल्ये, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक जबाबदारी विकसित करण्यावर भर दिला पाहिजे.भूमिपुत्र वाघ यांचे चिंतन"राजसत्ता जेव्हा सेवकत्व विसरते, तेव्हा लोकशाही कमकुवत होते. शिक्षण जेव्हा ज्ञान सोडून बाजाराच्या ताब्यात जाते, तेव्हा राष्ट्राची विचारशक्ती कमकुवत होते. भारताला केवळ आर्थिक महासत्ता नव्हे, तर न्याय, समानता आणि गुणवत्तेवर उभा असलेला समाज बनवायचा असेल, तर राजकारणाला नैतिकतेची आणि शिक्षणाला मानवी मूल्यांची जोड देणे अपरिहार्य आहे. अन्यथा पदव्या वाढतील, पण प्रज्ञा कमी होईल; सत्ता वाढेल, पण समाज दुर्बल होईल."भारताचे भविष्य संसदेच्या भिंतींमध्ये नव्हे, तर वर्गखोल्यांमध्ये घडते. म्हणूनच स्वार्थी राजकारणाऐवजी सेवाभावी नेतृत्व आणि बाजारपेठेऐवजी मूल्याधिष्ठित शिक्षण हीच नवभारताची खरी दिशा ठरली पाहिजे

**भूमिपुत्र वाघ**
**उमरगा**


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103



बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० जुलै २०२६

## जिंतूर शहरात गुटखा माफियांवर पोलिसांची मोठी कारवाई



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर)** : राज्यात गुटखा, पानमसाला आणि सुगंधी तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी असतानाही जिंतूर शहरात हा अवैध व्यवसाय सर्रास सुरू असल्याचे पुन्हा एकदा उघड झाले आहे. जिंतूर पोलिसांनी संभाजीनगर परिसरात धाड टाकून ₹३६,२३६ किमतीचा प्रतिबंधित गुटखा आणि पानमसाला जप्त केला. या कारवाईमुळे शहरातील अवैध गुटखा विक्रीचे जाळे पुन्हा एकदा चर्चेत आले असून संबंधित आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार संभाजीनगर परिसरातील एका ठिकाणी मोठ्या प्रमाणात गुटख्याचा साठा करून विक्री केली जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने छापा टाकला. तपासणीदरम्यान विविध ब्रँडचा प्रतिबंधित गुटखा, पानमसाला आणि तंबाखूजन्य पदार्थांचा मोठा साठा आढळून आला. पोलिसांनी संपूर्ण मुद्देमाल ताब्यात घेत आरोपीविरुद्ध गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.या कारवाईत जप्त करण्यात आलेल्या मालाची एकूण किंमत ₹३६,२३६ इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. ही कारवाई पोलिस निरीक्षक नामदेव रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून संबंधित अधिकाऱ्यांनी पंचनामा करून संपूर्ण माल जप्त केला.'बंदी' कागदावरच; शहरात गुटखा सहज उपलब्धमहाराष्ट्र शासनाने अनेक वर्षांपूर्वी गुटखा आणि सुगंधी तंबाखूजन्य पदार्थांच्या विक्रीवर बंदी लागू केली असली, तरी जिंतूर शहरातील अनेक भागांत हा प्रतिबंधित माल सहज उपलब्ध होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. किराणा दुकाने, पानटपऱ्या आणि काही घाऊक विक्रेत्यांकडे अशा पदार्थांची गुप्तपणे विक्री होत असल्याचा आरोप वारंवार केला जात आहे.नियमित धाडी होत असल्या तरी अवैध व्यवसाय पूर्णपणे बंद होत नसल्याने कारवाईची परिणामकारकता आणि सातत्यावर प्रश्न उपस्थित होत आहेत.मुख्य सूत्रधारांपर्यंत तपास पोहोचणार का?पोलिसांनी एका ठिकाणी कारवाई करून मुद्देमाल जप्त केला असला, तरी एवढ्या प्रमाणात गुटखा शहरात पोहोचतो कसा?, त्याचा पुरवठा कोण करतो?, यामागे मोठे रॅकेट कार्यरत आहे का?, अशी प्रश्नांची उत्तरे अद्याप मिळालेली नाहीत. केवळ किरकोळ विक्रेत्यांवर कारवाई न करता या अवैध साखळीतील मुख्य पुरवठादार, घाऊक व्यापारी आणि वाहतूक करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.अन्न व औषध प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्न गुटखा बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनाची असताना, अशा प्रकारे शहरात मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित माल सापडणे ही चिंतेची बाब असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत. संबंधित विभागाने नियमित तपासण्या, संयुक्त धाडी आणि पुरवठा साखळीवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असल्याची मागणी होत आहे.आरोग्यासाठी मोठा धोकावैद्यकीय तज्ज्ञांच्या मते गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनामुळे तोंडाचा कर्करोग, दात व हिरड्यांचे आजार तसेच इतर गंभीर आरोग्यविषयक समस्या उद्भवू शकतात. युवक आणि अल्पवयीन मुलांमध्ये वाढत असलेले व्यसन चिंतेचा विषय ठरत असून अशा अवैध विक्रीवर कठोर कारवाईची गरज व्यक्त होत आहे.ठळक मुद्देसंभाजीनगर परिसरात पोलिसांची धाड₹३६,२३६ किमतीचा प्रतिबंधित गुटखा जप्तएका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखलबंदी असूनही शहरात अवैध विक्री सुरू असल्याचे पुन्हा स्पष्टमुख्य पुरवठादारांवर कारवाईची नागरिकांची मागणीअन्न व औषध प्रशासनाच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह

## जय भवानी महाविद्यालयात गुरुपोर्णिमा उत्साहात साजरी



**पाटोदा (प्रतिनिधी):** दि. २९ जुलै :पाटोदा येथिल जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयात गुरु पोर्णिमा उत्साहात साजरा करण्यात आली . विद्यार्थ्यांनी स्वयंस्फुर्तीने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.प्रमुख पाहुणे म्हणुन श्री. शिवाजीराव पंडित महाविद्यालय, शिवाजीनगर गढी चे मार्गदर्शक प्राचार्य डॉ.विश्वास कदम हे होते.तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सदाशिव सरकटे हे होते.तर व्यासपीठावर माजी प्राचार्य डॉ.सुनिल जाधव,प्रा. सोमनाथ घाडगे, प्रा.डॉ.कल्पना घारगे व प्रा. विनोद किर्दक यांची उपस्थिती होती. प्रारंभी विद्यार्थ्यांनी प्राचार्य डॉ. विश्वास कदम व सर्व प्राध्यापक वृंदाचा गुरुपोर्णिमे निमित्त सत्कार केला.गुरुपोर्णिमा निमित्त कु. आकांक्षा मकाळ, कु. मुंढे अस्मिता, कु. कार्तिकी जगदाळे, कु. ढवळे अक्षरा, कु. ढवळे प्रतिक्षा, कु. शेख नवशाद, कु, कांडेकर श्रावणी, कु. तांबारे दिक्षा व विनायक बडे या विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करून शिक्षकाबद्दर कृतज्ञता व्यक्त केले.प्रा.डॉ. कल्पना घारगे यांनी मनोगत व्यक्त करताना गुरु पोर्णिमेचे महत्व सांगितले. शेवटी प्रमुख पाहुणे प्राचार्य डॉ. विश्वास कदम यांनी गुरु -शिष्याच्या नात्यासारखे पवित्र नाते दुसरे कोणतेही नाते नाही हे सांगुन जिवनात गुरुचे महत्वाचे स्थान असुन आपण सर्व जन गुरुमुळेच घडलो आहोत. तेव्हा सदैव गुरुबाबत आदर ठेवावा असे सांगितले. व गुरु पोर्णिमेच्या सर्वांना शुभेच्छा ! दिल्या. कार्यक्रमाचे संचलन प्रा. अशोक देवगुडे यांनी केले. तर आभार प्रा.बंडू लोखंडे यांनी व्यक्त केले. या संपूर्ण कार्यक्रमाचे फेसबुक लाईव्ह प्रेक्षपण नाटककार प्रा. बापू घोक्षे यांनी केले. या प्रसंगी सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व बहुसंख्य विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

## कालिकादेवी विद्यालयात स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांना अभिवादन..



**शिरुर कासार** : कालिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शिरूर (का.) जि.बीड येथे, 'कर्मयोगी स्व.सोनाजीराव (नाना) क्षीरसागर' यांचा 'एकोणिसावा स्मृतिदिन' साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य केशव भांगे साहेब, उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने, उपमुख्याद्यापक सिद्धेश्वर शिंदे, पर्यवेक्षक जनार्दन काळे, विज्ञान विभाग प्रमुख,प्रा.संजय काकडे, परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, प्रा.महारुद्र डोंगरे, प्रा.अशोक इनकर, प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.संजय आव्हाड, प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.नारायण तांबे, प्रा.महादेव हांगे, प्रा.नारायण घोलप, प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.लक्ष्मण गव्हाणे, प्रा.विनोद गलांडे, प्रा.दत्ता शिंदे, प्रा.रविंद्र संकपाळे, प्रा.अशोक सवासे, प्रा.सुनिल मोरे, प्रा.शशिकांत जावळे, प्रा.हनुमंत घायाळ, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.सविता दराडे, प्रा.रेखा निर्मळ, प्रा.सिमा ढवळे, श्रीमती अनिता लाटे, रविंद्र बडे, आप्पासाहेब कांबळे, विनायक सुरवसे, जयेंद्र निकम, राजू बडे, रवी जोशी, नितीन बहिर,रविंद्र गव्हाणे, सुंदर शिंदे, आदिनाथ काशिद, सुनिल खेडकर, नंदकुमार जाधव, विलास कांबळे, गौतम भोसले,या सर्वांनी स्व. सोनाजीराव (नाना) क्षीरसागर यांच्या प्रतिमांना पुष्पांजली वाहून अभिवादन केले.यावेळी कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० जुलै २०२६


## मुरूममध्ये सहकार प्रशिक्षण शिबिर संपन्न




**जिंतूर (सुधीर पंचगल्ले) :** आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्ताने महाराष्ट्र राज्य सहकारी संघ मर्यादित, पुणे संचलित सहकार प्रशिक्षण केंद्र, लातूर यांच्या वतीने मुरूम येथील श्री महात्मा बसवेश्वर ग्रंथालय सभागृहात दोन दिवसीय सहकार प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बुधवार ता. २९ व गुरुवार ता. ३० रोजी पार पडलेल्या या प्रशिक्षण शिबिराला परिसरातील विविध पतसंस्था आणि बँकांच्या कर्मचाऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.प्रमुख मार्गदर्शक व सहभागया शिबिरात सोलापूरचे नरेंद्र नारायण कुलकर्णी आणि लातूर सहकार प्रशिक्षण केंद्राचे प्रभारी व उपप्राचार्य गंगाधर जाधव यांनी उपस्थितांना सहकार क्षेत्राचे धडे दिले. पतसंस्थेचे कामकाज अधिक पारदर्शक व गतिमान होण्यासाठी त्यांनी उपस्थितांना बहुमूल्य मार्गदर्शन केले. यावेळी महात्मा बसवेश्वर पतसंस्थेचे अध्यक्ष शिवशरण वरनाळे, संचालक श्रीशैल बिराजदार, अमृत वरनाळे, बाबासाहेब पाटील, सौ. संगीता जाधव, व्यापारी नागरी पतसंस्थेचे संचालक दतु गिरीबा यांची प्रमुख उपस्थिती होती.मुरूम परिसरातील संस्थांचे संचालक, पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.श्री महात्मा बसवेश्वर नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुरूम, व्यापारी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुरूम, माऊली नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, मुरूम, सोमेश्वर पतसंस्था, आलूर, सरस्वती पतसंस्था, आलूर, लोकहित बिगर शेतकरी सहकारी पतसंस्था, आलूर आदी पतसंस्थेच्या पदाधिकारी, कर्मचाऱ्यांनी सहभाग नोंदवला.सहकारी संस्था, नागरी बँका आणि बिगर शेतकरी सहकारी पतसंस्थांच्या कार्यात सुसूत्रता आणणे, कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करणे आणि प्रशासकीय कामकाज नियमांनुसार चालवणे, कर्ज वाटप, वसुलीतील कायदेशीर बाबींवर सखोल मार्गदर्शन, असे अनेक उद्देशाने हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले होते. दोन दिवस चाललेल्या या शिबिरामुळे परिसरातील सहकार चळवळीला अधिक बळ मिळेल, असा विश्वास शिवशरण वरनाळे यांनी व्यक्त केला. फोटो ओळ : मुरूम, ता. उमरगा येथील बसवेश्वर पतसंस्थेच्या सभागृहात दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिरामध्ये सोलापूरचे नरेंद्र कुलकर्णी मार्गदर्शन करताना


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


## तुटलेपणाची भावना आणि स्वाभिमानाचा संघर्ष म्हणजे एक भाकर तीन चुली




**(लातूर) :** समाजातील विखुरलेली कुटुंबव्यवस्था आणि मर्यादित साधनसंपत्ती यामुळे एकाच घरातील माणसे वेगवेगळ्या चुलींवर जगू लागल्याने नात्यांमधील दुरावा, आर्थिक अडचणी आणि भावनिक वेदना या विचित्र बनत चाललेल्या आहेत. अशात एखाद्या स्त्रीला अपघाताने तीन नवरे करावे लागले त्यात एकाच अपत्याला घेऊन संसार करताना होणारी तुटलेपणाची भावना आणि स्वाभिमानाचा संघर्ष म्हणजे एक भाकर तीन चुली हि साहित्यकृती होय असे मत डॉ. बळीराम भुकतरे यांनी व्यक्त केले. चला कवितेच्या वनात या उपक्रमांतर्गत सातत्यपूर्ण चालू असलेल्या वाचक संवादाचे 365 वे पुष्प प्रा. डॉक्टर बळीराम भुकतरे यांनी देवा झिंजाड यांच्या एक भाकर तीन चुली या साहित्यकृतीवर संवाद साधून गुंफले. पुढे बोलताना ते म्हणाले ग्रामीण जीवनात दारिद्य, कष्ट आणि स्वाभिमाना यांच्या संघर्षातून माणुसकी, त्याग आणि कुटुंबमूल्यांचा प्रभावी संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येतो. "भाकर वाटून खाल्ली तर पोट भरते; पण मनं तुटली तर कोणतीही संपत्ती माणसाला सुखी करू शकत नाही." यातून ही साहित्यकृती वाचकाला ग्रामीण समाजजीवन, कुटुंबातील नात्यांचे महत्त्व आणि एकोप्याची जाणीव करून देते. अध्यक्षीय समारोप करताना प्राध्यापक डॉ. दिलीपराव जाधव म्हणाले की, एक भाकर तीन चुली ही देवा झिंजाड यांची एक महत्त्वपूर्ण मराठी साहित्यकृती आहे. यामध्ये संवेदनशील मन, दारिद्य, कष्ट याचे वास्तववादी चित्रण केले आहे. या कार्यक्रमाच्या यशस्वीततेसाठी प्रा. सुरेश शिंदे बेंबरेकर, मुरलीधर जाधव, प्रा.राजपाल पाटील , तुळशीदास बिरादार, हनुमंत मेत्रे , आनंद बिरादार, तुकाराम बिरादार, वीरभद्र स्वामी , गोविंद सावरगावे , सुरेश वजनाम आदींनी परिश्रम घेतले

## श्री. पी. पी. शिंदे व श्री. राजपूत सरांचा सेवापूर्ती गौरव सोहळा



**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** मनपा प्रा.व मा.विद्यालय चिकलठाणा शाळेत केंद्रिय मुख्यध्यापक श्री.पी.पी.शिंदे सर व मनपा प्रा.व.मा.विद्यालय चिकलठाणा.शाळेतील सहशिक्षक श्री. एस. जी. राजपूत सर नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्यामुळे मुख्याध्यापक श्री.पी.पी.शिंदेसर व श्री. राजपुत सर यांचा सपत्नीक सत्कार करुन." सेवापुर्ती गौरव सोहळा " साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजसेवक श्री .रामेश्वरभाऊ कोरडे प्रमुख पाहुणे म्हणून शालेय व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष श्री.कैलासभाऊ रिठे उपस्थितीत होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक श्रीमती.संगीता चव्हाण मॅडम यांनी केले.सत्कारमुर्तीचा जीवन परीचय श्रीमती बेबी राऊत मॅडम यांनी केले.शाळेचे मुख्याध्यापक श्री.वसंत राठोड यांच्या मार्गदर्शन खाली श्री.वाघसर ,श्री.पठाण सर, श्री. संदिप चव्हाणसर, सुर्यवंशी सर ,श्रीम. तारो मॅडम श्रीमती. अर्चना भारद्वाज मॅडम श्री.अनुजा भिंगोले मॅडम, श्रीम.मनिषा शिंदे मॅडम, श्री.फुलंब्रीकर मॅडम बालवाडी शिक्षिकाश्रीम.विध्या कानडे मॅडम , श्री कवठेकर मॅडम, सेविका श्री.सुनिता साबळे मावशी, श्री.सुजाता भोसले मावशी. श्री. खापेमामा या सर्वांनी कार्यक्रमाची शोभा वाढविण्यासाठी परीश्रम घेतले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ३० जुलै २०२६


## प्रमोद शृंगारला फायरिंगमध्ये सुवर्णपदक



**मुरुम (सुधीर पंचगल्ले) :** श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालय उमरगा येथील एनसीसी विभागाचा कॅडेट प्रमोद शृंगार यांनी अमरावती येथे पार पडलेल्या थल सैनिक कॅम्प मध्ये सुवर्णपदक प्राप्त केले. 53 महाराष्ट्र बटालियन एनसीसी लातूर तसेच छत्रपती संभाजी नगर एनसीसी ग्रुप तर्फे प्रमोद शृंगार याची निवड झाली होती हा कॅम्प अमरावती येथे घेण्यात आला महाराष्ट्रातील सर्व एनसीसी च्या फायरिंग मध्ये सहभागी घेतलेल्या महाराष्ट्रातील एकूण सात ग्रुप मधून मुंबई एक, मुंबई दोन, पुणे, कोल्हापूर, अमरावती, नागपूर, व छत्रपती संभाजीनगर यातील मुले, मुलींनी या कॅम्प निवडीसाठी सहभाग घेतला होता महाविद्यालयातील दोन कॅडेटसनी सहभाग घेतला होता यामध्ये सर्वानुक्रमे प्रमोद यांनी सर्वोत्कृष्ट कामगिरी करून सुवर्णपदक मिळवले. याबद्दल भारत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अमोल मोरे यांनी प्रमोद तसेच सहभागी एनसीसी विभागाची कॅडेट भूमिका शेंडगे यांना प्रमाणपत्र व पदक देऊन दोघांचा गौरव केला. अमोल मोरे यांनी पुढे दिल्ली येथे होणाऱ्या कॅम्प साठी त्यांनी महाराष्ट्राच्या संघात त्याची निवड व्हावी व महाविद्यालय, लातूर बटालियन,छत्रपति संभाजी नगर ग्रुप तसेच महाराष्ट्राचे नाव दिल्ली येथे होणाऱ्या थल सैनिक कॅम्प मध्ये सहभाग नोंदवून देशात प्रथम क्रमांक मिळवावा यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या. या सत्कार समयी प्राचार्य डॉ संजय अस्वले,डॉ विनोद देवरकर,डॉ पदमाकर पिटले,कॅप्टन डॉ ज्ञानेश्वर चिट्टमपल्ले,निळकंठ माने व प्रमोद चे वडील सर्व प्राध्यापक, प्राध्यापिका शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## आमदार प्रवीण स्वामी यांची श्रीकृष्ण महाविद्यालयास भेट



**उमरगा : (प्रा. नागसेन कांबळे)** उमरगा तालुक्यातील गुंजोटी येथे असलेल्या श्रीकृष्ण महाविद्यालयास आज उमरगा लोहारा तालुक्याचे आमदार प्रवीण स्वामी यांनी नुकतीच भेट दिली .श्रीकृष्ण महाविद्यालय यांच्या भव्य प्रांगणात अलीकडेच तालुक्याचे विस्तृत असे सुसज्ज क्रीडा संकुल उभारण्यात आले आहे. उमरगा_ गुंजोटी रोड वरून आतमध्ये श्रीकृष्ण महाविद्यालय व तालुकास्तरीय क्रीडा संकुल यांच्यादरम्यान 200 मीटरचा अंतर रस्ता आहे. हा रस्ता अतिशय कच्चा स्वरूपाचा असून ,अशा खडबडीत व धोकादायक रस्त्यावरून कोणत्याही प्रकारचे वाहन सहजासहजी जाऊ शकत नाही. महाविद्यालयीन विद्यार्थी ,पालक व कर्मचारी_ प्राध्यापक यांना रहदारी करणे अतिशय कठीण व धोकादायक झाले आहे. पावसाळ्यात तर या रस्त्यावरून जाणे येणे करणे अशक्य होऊन बसले आहे. याशिवाय क्रीडा विभागाचे अधिकारी आणि खेळाडूंना सुद्धा सातत्याने येण्या जाण्यास अडचणी निर्माण होत आहेत. या संदर्भात संबंधितांना वेळोवेळी निवेदन व विनंती करून पाठपुरावा केला तरी या रस्त्याचे काम आज पर्यंत दुर्लक्षितच राहिले असून स्वतः आमदार साहेबांनी यात लक्ष घालून,आपल्या आमदार निधीतून , रस्त्याविना महाविद्यालय व क्रीडा संकुल यांची होणारी गैरसोय व अडचण दूर करून महाविद्यालय व क्रीडा संकुलाची होणारी परवड कायमस्वरूपी पक्का रस्ता करून दूर करावी ,अशा आशयाचे निवेदन आमदार प्रवीण स्वामी यांना महाविद्यालयाच्या वतीने एका छोटेखानी कार्यक्रमात देण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड, क्रीडा शिक्षक प्रा.डॉ. रमेश पात्रे याशिवाय महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी व तालुक्याचे सर्व क्रीडा अधिकारी आवर्जून उपस्थित होते .यावेळी आमदार स्वामी यांनी महाविद्यालयाच्या वतीने केलेला सत्कार स्वीकारला आणि महाविद्यालय व क्रीडा संकुलाची सविस्तर अशी संपूर्ण पाहणी करून क्रीडा संकुलाच्या इतर समस्या व अडचणी शांतपणे ऐकून घेतल्या व सकारात्मक प्रतिसाद दिला आणि लवकरात लवकर आपल्या सर्व प्रलंबित मागण्या मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

## पतंजलीच्या वतीने जिंतूर येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



**जिंतूर (बी. डी. रामपूरकर) :** पतंजली योगपीठ, हरिद्वार यांच्या निर्देशानुसार जिंतूर येथे गुरुपौर्णिमानिमित्त योगसाधना, वैदिक यज्ञ आणि गुरु महिमा याविषयी प्रबोधनपर कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. सकाळी 5.30 ते 7.00 या वेळेत नियमित योगवर्गाचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर वरुड रोडवरील साई सृष्टी गार्डन येथे सकाळी 7.00 ते 8.30 या वेळेत वैदिक पद्धतीने यज्ञ करण्यात आला. यज्ञामध्ये अनेक साधकांनी सहभागी होत वातावरण भक्तिमय केले. या कार्यक्रमात भारत स्वाभिमान न्यासचे जिल्हा प्रभारी धोंडीराम शेप यांनी गुरूंचे जीवनातील अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले. जीवनाला योग्य दिशा, ज्ञान, संस्कार आणि मूल्यांची जाणीव करून देण्याचे कार्य गुरू करतात. गुरूंच्या ऋणाची जाणीव ठेवून त्यांचे स्मरण करण्यासाठी गुरुपौर्णिमा हा अत्यंत पवित्र दिवस असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच यज्ञाचे वैज्ञानिक महत्त्व स्पष्ट करताना तूप व औषधी वनस्पतींच्या आहुतीमुळे वातावरण शुद्ध होण्यास मदत होते आणि अनेक आजारांपासून संरक्षण मिळण्यास सहाय्य होते, असे त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमाचे यजमान म्हणून श्री. पुरुषोत्तम अंभुरे व सौ. अंभुरे तसेच श्री. प्रकाश घुगे व सौ. घुगे यांनी जबाबदारी पार पाडली. यावेळी भारत स्वाभिमानचे जिल्हा कोषाध्यक्ष वसंतराव देशमुख, पतंजली किसान सेवा समितीचे तहसील प्रभारी लखूजी जाधव, सोशल मीडिया तहसील प्रभारी सचिन रायपात्रीवार, संरक्षक सदस्य हरिभाऊ केंद्रे, युवा भारतचे सहप्रभारी संतोष आंधळे तसेच गेल्या साडेचार वर्षांपासून नियमित सुरू असलेल्या स्थायी योगवर्गाचे सदस्य विश्वनाथ बोरुंडे, रवी आढे, ज्ञानेश्वरजी, दिलीपराव राठोड, चव्हाणजी, दत्ताभाऊ तळेकर, गजाननजी, विष्णु जाधव, किशनराव वाटाणे, अश्विन सोनवणे आणि अन्य साधक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचा समारोप शांतिपाठाने करण्यात आला. संपूर्ण कार्यक्रमात गुरुभक्ती, योगसाधना आणि भारतीय संस्कृतीचा जागर जागर प्रसार करण्याचा संदेश देण्यात आला.


